---

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा
## संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२१ श्री अरुण शेवाने यांना जाहीर
## २३ फेब्रुवारी रोजी होणार प्रदान

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीत नमूद संदेशाप्रमाणे केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल दिला जाणारा 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२१' जाहीर झाला असून दि. २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी विद्यापीठाचे कार्यकारी कुलगुरू डॉ. विलास भाले यांचे शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व.द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२१' यावर्षी मु.पो. कापुसतळणी, ता. अंजनगांव, जि. अमरावती येथील श्री अरुण वामनराव शेवाने यांना घोषित झाला आहे. दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. श्री अरुण शेवाने यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ११/०२/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी